# प्रेसनोट दि. ०९/०७/२०१९

## कुख्यात गुंड रोहीदास चोरगे टोळीने आणेवाडी टोल नाका, सातारा येथे केलेल्या गोळीबाराच्या गुन्हयासह मोका मध्ये पाहिजे असलेले कुख्यात गुंड लहु माने व भगवान खुटवड हे युनिट - १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडून जेरबंद

-----ooo----------ooo----------ooo----------ooo-----

दि. २५/०३/१९ रोजी ०१.०० वा.चे सुमारास टोलवरुन झालेल्या वादातुन सातारा पुणे महामार्गावरील आणेवाडी टोलनाक्यावर पुण्यातील कुख्यात गुंड रोहीदास ऊर्फ बापु चोरगे व त्याचे इतर साथिदारांनी गोळीबार करुन टोलनाक्यावरील कर्मचा-यांना मारहाण केली होती त्याबाबत **भुईज पोलीस ठाणे गुन्हा रजि ४४/१९ भा.द.वि कलम ३०७,३२६,१४३,१४७,१४८,१४९ आर्म ॲक्ट ३(२५),महा.पो.का.क.३७(३)सह १३५ व महा. संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा क** ३(१)(२),३(२),३(४) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यापैकी काही आरोपी दाखल गुन्हयांत अटक करण्यात आले होते सदर गुन्ह्यात रोहीदास चोरगे याचेसह काही आरोपी अद्याप फरारी आहेत

युनिट -१, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील अधिकारी व कर्मचारी पेट्रोलिंग करिता असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना बातमीदारामार्फत मिळाली की सदर गुन्हयांत फरारी असलेले आरोपी लहु माने व भगवान खुटवड हे कोंढवा येथील टिळेकर नगर इस्कॉन चौकात येणार आहेत. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्या बाबत मा. पोलीस निरीक्षक सो. श्री. अरुण वायकर यांना माहिती देवुन वरिष्ठांचे परवानगीने युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडील स्टाफसह बातमी प्रमाणे जावुन नमुद आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्यानी त्याची नावे **१. लहु जनार्धन माने.वय ३६ वर्षे, रा.सुखसागरनगर, बनकर शाळेचे मागे, कात्रज, पुणे. २. भगवान महादेव खुटवड, वय** ४५ **वर्षे, रा.प्लॅट नं ११, गुरुदत्त विहार, शनी मंदीराजवळ, भारती विदयापीठ, पुणे**. असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे भुईंज पोलीस स्टेशनकडील वरील दाखल गुन्हयाचे अनुशंगाने त्यांना विश्वासात घेवुन तपास करता त्यानी सांगितले की, आम्ही आमचे मित्र रोहीदास चोरगे, सोपान चोरगे, लक्ष्मण लेकावळे, हरगुडे व इतर साथिदार असे मार्च महिन्यामध्ये मित्रांच्या गाड्यामधुन कोल्हापुर येथुन देवीदेर्शन घेऊन पुण्याला परत येत असताना आणेवाडी टोलनाका येथे टोल भरण्याच्या कारणेवरुन भांडणेझाली त्यावेळी आम्ही गोळीबार करुन आम्ही पळुन गेलो. सदर गुन्हा दाखल झाले पासुन आम्ही फरार होतो असे सांगितले आहे भुईंज पोलीस स्टेशन, सातारा येथे गुन्हा दाखल असल्याने पुढील कारवाई कामी त्यास भुईंज पो स्टे सातारा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर आरोपी पैकी लहु माने याचेवर यापुर्वी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. २५८/११ भादंवि क ३०२,३०७,१४३,१४८,१४९
२) सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. २४/०९ भादंवि क ३०७,३९५,३९७,४२७
३) सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ३०४५/१५ महा. पो. अधि. क १४२
४) बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ३०/१४ महा. पो. अधि. क १४२

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत शिंदे, पोलीस कर्मचारी योगेश जगताप, अजय थोरात, अनिल घाडगे, अमोल पवार, वैभव स्वामी, सुधिर माने, बाबा चव्हाण यांनी केली आहे.